# दिव्य वार्ता

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- मंगळवार दि.२१ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३





# दिपावली व पाडव्याच्या

सर्व वाचक, जाहिरातदार, शुभचिंतक यांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा

–संपादक
दिव्य वार्ता,कश्मकश















# ‘स्वत:ला सरकार समजू नका’

## मेधा कुलकर्णींच्या ‘शुद्धीकरणा’मुळे महायुतीत फूट

**मुंबई , (दिव्य न्युज):- आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तोंडावर, पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्याच्या 'शुद्धीकरण' प्रकरणावरून महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुतीत मोठी फूट पडल्याचे चित्र आहे. शनिवार वाड्यात काही महिलांनी नमाज पठण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर भाजपच्या राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी आक्रमक होत तिथे जाऊन शुद्धीकरण केले होते. यावेळी त्यांनी शनिवारवाडा परिसरातील मजार काढून टाकण्याची मागणी केली. यावरुन एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही मित्रपक्षांनी भाजपवर थेट निशाणा साधला आहे.**

शनिवारवाड्याच्या परिसरात काही मुस्लिम महिलांनी नमाज अदा केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या घटनेचा निषेध करत भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी हिंदूत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांसह रविवारी त्या जागेवर गोमूत्र शिंपडून शुद्धीकरण केले. एवढेच नाही तर, शनिवारवाड्याबाहेरील दर्गा आणि मजार एका आठवड्यात हटवण्याचा अल्टिमेटमही त्यांनी दिला. मेधा कुलकर्णींच्या या कृतीनंतर मित्रपक्षांनी त्यांच्यावर नाराजी व्यक्त केली. त्यांनी थेट भाजपला आपल्या खासदाराला लगाम घालण्याची आणि त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी मेधा कुलकर्णी यांच्यावर धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. आम्ही भाजपला त्यांच्यावर लगाम घालण्याची मागणी करत आहोत. जरातीय तणाव निर्माण करण्याच्या प्रयत्न केल्याबद्दल त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी ठोंबरे यांनी केली. हिंदू-मुस्लिम पुण्यात गुण्यागोविंदाने राहत असताना कुलकर्णींनी असे करण्याची गरज नव्हती, असेही त्या म्हणाल्या. सोमवारी सायंकाळी त्यांनी कुलकर्णींविरोधात आंदोलनही केले. भाजपसोबत सत्तेत सामील झाल्यानंतर अल्पसंख्याक समाजातील मतदारांवरची पकड पुन्हा मजबूत करण्याच्या राष्ट्रवादीच्या प्रयत्नाचा हा भाग असल्याचे मानले जात आहे.

हिंदुत्ववादी विचार घेऊन सत्तेत आलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही या मुद्द्यावर मेधा कुलकर्णींवर टीकास्त्र सोडले आहे. शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांनी मेधा कुलकर्णी यांना कुणीही आपण सरकार असल्याच्या थाटात वागू नये असं म्हटलं. शनिवारवाडा हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाद्वारे संरक्षित स्थळ आहे. येथे काय करावे आणि काय करू नये, याचे काही नियम आहेत आणि त्याचे पालन करणे आवश्यक आहे. नियम मोडले गेले असतील तर त्यासाठी राज्य सरकारचे पोलीस आहेत. अशावेळी कोणीही स्वतःच आम्हीच सरकार असल्यासारखे वागू नये. नियमांचे उल्लंघन झाल्यास जिल्हाधिकारी आणि राज्य पोलिसांनी कारवाई करावी, असे नीलम गोऱ्हे म्हणाल्या.दरम्यान, पुण्यातील राजकारण तापले मेधा कुलकर्णी यांच्या आंदोलनानंतर पोलिसांनी संरक्षित स्थळी नमाज अदा करणाऱ्या अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे पुण्यात, स्थानिक निवडणुकांपूर्वी महायुतीतील अंतर्गत वाद आणि राजकीय तणाव स्पष्टपणे समोर आला आहे.

# भाजप खासदार मेधा कुलकर्णींना अटक होणार ?



## शनिवारवाड्यात मुस्लिम महिलांच्या नमाज पठणावरून भाजप खासदार कुलकर्णींचं आंदोलन

पुणे , (दिव्य न्युज):-शनिवारवाड्यात मुस्लिम महिलांनी नमाज पठण केल्याने नव्या वादाला तोंड फुटलं आहे. या नमाज पठणाला विरोध करत भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी आंदोलन केलं. खासदार मेधा कुलकर्णींच्या भूमिकेला अजित पवार गटाच्या रुपाली ठोंबरे यांनी जोरदार विरोध केला. भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांच्या विरोधात आंदोलन करत त्यांच्या अटकेची मागणी केली. या शनिवारवाडा प्रकरणावरून पुण्यातील राजकीय वातावरण तापलं आहे.

शनिवारवाडा प्रकरणावरून महायुतीत वाद पेटला आहे. शनिवारवाड्यात नमाज पठण झाल्याचा आरोप करत आणि शनिवारवाड्याच्या परिसरातील कबर काढा, या मागण्यांसाठी मेधा कुलकर्णी यांनी हिंदुत्ववादी संघटनासह या शनिवारवाडा परिसरात आंदोलन केलं होतं. भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांच्या आंदोलनानंतर अजित पवार गटाच्या महिला नेत्या रुपाली ठोंबरे मैदानात उतरल्या. मेधा कुलकर्णी यांच्या आंदोलनाला प्रत्युत्तर देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली ठोंबरे यांनी कार्यकर्त्यांसह शनिवारवाड्यात आंदोलन केलं.कुलकर्णी यांच्यावर महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवक्त्या रूपाली ठोंबरे यांनी सडेतोड टीका केली. मेधा कुलकर्णी या पर्सनल अजेंडा राबवतात आणि त्यांना नौटंकी करायची सवय आहे. कुलकर्णी या भाजपाच्या असल्यामुळे भाजपच्या नेत्यांनी त्यांना थांबवायला पाहिजे. कारण त्या शिक्षिका आहेत. त्यांची डिग्री तपासावी लागेल,असं सुद्धा रूपाली ठोंबरे म्हणाल्या. यावेळी आंदोलकांनी मेधा कुलकर्णी मुर्दाबाद, मेधा कुलकर्णींवर गुन्हा दाखल करून अटक करा, अशी घोषणाबाजी केली. ठोंबरे यांच्या मागणीनंतर मेधा कुलकर्णींना अटक होणार का, हे पाहावे लागेल.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते सचिन खरात यांनी म्हटलं की, खासदार मेधा कुलकर्णी नमाज पठणाने तुमच्या धार्मिक भावना दुखावल्या. मग शनिवारवाड्यामध्ये मस्तानी दरवाजा आहे. त्यामुळे तुमच्या धार्मिक भावना दुखत नाही का? त्याचे काय करणार, असा प्रश्न रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गटाचे अध्यक्ष सचिन खरात यांनी उपस्थित केला. बाजीराव आणि मस्तानी यांना शमशेर नावाचा मुलगा होता. मग तुम्हाला बाजीराव चालतात मग शमशेरबद्दल तुमचं मत काय आहे, असा प्रश्न खरात यांनी उपस्थित केला.




# प्रभाग क्रं. २३ अ मधून एमआयएमचे जेष्ठ नेते सलाम शेठ याना पक्षाची उमेदवारी

### प्रभाग क्रं. २३ च्या लढतीमध्ये येणार आता जोरदार रंगत





बीड, (दिव्य न्युज):- एमआयएम पक्षाची आज स्थानिक स्वराज्यच्या निवडणूकी संदर्भात औरंगाबाद येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत बीड, अंबाजोगाई, परळी, माजलगाव, गेवराई, धारूर, आष्टी या नगर पालिका निवडणुकी संदर्भात सविस्त चर्चा करण्यात आली. बैठकीला एमआयएमचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक यांच्यासह जिल्ह्यातील एमआयएमचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येणाऱ्या निवडणुकी संदर्भात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसमोर जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यानी आपला संपूर्ण अहवाल सादर केला. पक्षाच्या नेत्यांनी जिल्हाध्यक्षांसह सर्व कार्यकर्त्यांना या निवडणुकीत पुर्ण ताकदीने निवडणूक लढण्यासाठी सज्ज होण्याचे आदेश दिले असून एमआयएम पक्षाची सर्वात जास्त नजर बीड नगर पालिकेवर असणार आहे. बीड नगर पालिकेत नगराध्यक्षांसह सर्वच प्रभागात एमआयएम आपले उमदेवार उभे करणार आहेत. शहरातील प्रभागा क्रं. २३ अ मधून एमआयएमचे जेष्ठ नेते अब्दुल सलाम शेठ यांना पक्षाने उमेदवारी देवून त्यांना प्रभाग क्रं. २३ अ मधून निवडणूक लढण्याचे आदेशित केल्याची माहिती आहे. आज झालेल्या बैठकीत हा निर्णय झाल्याची अधिकृत माहिती असून आता प्रभाग क्रं. २३ अ मधून सलाम शेठ यांच्या उमेदवारीमुळे रंगतदार लढत होणार असून या लढतीकडे बीड शहराचे लक्ष लागून राहणार आहे.

# अनुदान पत्र वाटून माध्यमिक शिक्षण अधिकारी पाटील मॅडम यांनी अंश अनुदानित शाळा चे शिक्षकांची थट्टा केली

### दिवाळी पूर्व वेतन ना अदा करता दिवाळी गोड होण्याऐवजी काळी आणि कडू झाली

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील स्काऊट भवन येथे ३० सप्टेंबर रोजी बीड जिलहा परिषद चे शिक्षण विभागातर्फे कर्यक्रम आयोजित करून मोठ्या थाटाने गाजा वाजा करत टप्पा वाढ झालेल्या अंश अनुदानित शाळांना माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया पाटील मॅडम अनुदान पत्र वाटप करून शिक्षणाची दिवाळी गोड होणार म्हणून परिसिद्धी घेतली व प्रसार माध्यमाना ही दिली.

वास्तविकता पाहता शिक्षकांचे पगार १८ ऑक्टोबर २०२५ प्रियंत होणे अपेक्षित होते कारण की याचा शासन निर्णय २५ अगस्ट रोजी निघाला व त्यासाठी निधीची तरदूत करण्यात आली.त्यानुसार सप्टेंबर मध्ये सघडी प्रकिरिया पूर्ण करून सप्टेंबर चा पगार टप्पा वाढ करून ऑक्टोबर मध्ये होण्याचे गरजेचा होता पण तांत्रिक दृष्टीया कारण पुढे करून तसे काही झाला नाही.



त्या नंतर ३० सप्टेंबर रोजी स्काऊट भवन येथे माध्यमिक शिक्षण अधिकारी प्रिया पाटील यांनी टप्पा वाढचे अनुदानास पात्र शाळा ना पत्र देऊन शिक्षकांची दिवाळी गोड करू असे सांगण्यात आले त्यानुसार ऑक्टोबर महिन्याचे पगार १८ ऑक्टोबर पर्यत अपेक्षित होते.त्या मुळे अंश अनुदानित शाळा चे शिक्षकांची दिवाळी गोड होण्या ऐवजी कडू व काळी झाली.या बाबत प्रिया पाटील मॅडम यांनी या शिक्षकांचे जखमेवर मीठ छिडकण्याचा काम केले, व या शिक्षकांनाचे थट्टा केली आहे असे पत्र शिक्षक भारतीचे बीड जिल्हा अध्यक्ष अयाज कागजी यांनी दिले आहे



# अक्षरशः भटक्या कुत्र्यांनी लचके तोडल्याने तीन वर्षीय परीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला!

## आता तरी ग्रामपंचायत, नगरपरिषद प्रशासन भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणार नाही?





### दीपावलीच्या सणाची लगबग सुरू असताना जालना शहरातील हृदय द्रावक आणि मन सून्न करणारी घटना

बीड । दिव्य न्युज

शहर असो किंवा गाव प्रत्येक ठिकाणी भटक्या कुत्र्यांची मोठ्या प्रमाणात संख्या वाढली आहे. याबाबत वेळोवेळी सुजाण नागरिक संबंधित नगरपरिषद किंवा ग्रामपंचायत प्रशासनाला याबाबत सूचना करतात परंतु नेहमीच या सूचनांकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचे गंभीर परिणाम म्हणजे जालना शहरामध्ये दीपावलीच्या सणाची लगबग एकीकडे सुरू असतानाच सकाळी एक हृदय द्रावक आणि मन सून्न करून टाकणारी घटना घडली. यशवंत नगर परिसरात राहणाऱ्या तीन वर्षीय चिमुकली परी दीपक गोस्वामी हिचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. परीचा भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेला मृतदेह पाहून अक्षरशः अनेकजण हादरून गेले. या दुर्दैवी घटनेमुळे अनेकांचे हृदय पिळवटून निघाले तर प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रचंड संतापही व्यक्त केला गेला.

### परीच्या शरीरावर सर्वत्र कुत्र्यांनी लचके. तोडल्याच्या खुणा होत्या, हे दृश्य पाहणारे अक्षरशः हादरून गेले !!

### शहरभरात पसरली शोककळा !

जालना शहरांमध्ये घटना घडतात शहरात शेकडा पसरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. जालना शहरातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे पुन्हा एकदा महानगरपालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. घटनेविषयी मिळालेल्या सविस्तर माहिती नुसार जालना अंबड राज्य महामार्गा लगत असलेल्या यशवंत नगर परिसरात सकाळी नऊच्या सुमारास स्थानिक नागरिकांना एका लहान मुलीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. नागरिकांनी जवळ जाऊन पाहिले असता ती मुलगी त्यांच्या परिसरातील परी दीपक गोस्वामी असल्याचे समोर आले. परिच्या शरीरावर सर्वत्र कुत्र्यांच्या चाव्याच्या खुणा होत्या, हे दृश्य पाहून सर्वजण हादरून गेले.

### जालना शहरात या घटनेबाबत तर्क-वितर्क!

● ही घटना समोर आल्यानंतर शहरभर चर्चा सुरू झाली की, परीसोबत नेमके काय घडले? काहींनी कुत्र्याच्या हल्ल्याची शक्यता मानली तर काहींनी दुसऱ्या प्रकारची शंका उपस्थिती केली आहे. पोलिसांनी मात्र सांगितलं की, फॉरेन्सिक अहवाल आल्यानंतरच सर्व गोष्टी स्पष्ट होतील. सध्या आम्ही सर्व बाजूने तपास सुरू केला आहे. त्याचबरोबर परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहेत. दरम्यान या अनुषंगाने प्रत्येक संशयास्पद हालचालींचा मागोवा घेतला जात आहे.




भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात छोटी मुले आणि वृद्ध जखमी झाल्याचे वृत्त सर्वत्र ऐकवयास मिळत आहेत. विशेष म्हणजे अशा घटनांमध्ये आता दिवसेंदिवस वाढ होत असताना पहावयास मिळत आहे. या अनुषंगाने ग्रामपंचायत अथवा नगरपरिषद प्रशासनाला वेळोवेळी सर्वसामान्य जनता सूचना देत

### आपल्या लेकीचा निर्जीव देह पाहताच आई-वडिलांनी एकच हंबरडा फोडला!

घटनेची माहिती मिळताच परिचय आई-वडील घटनास्थळी पोहोचली आपल्या लेकीचा निर्जी उद्या पाहताच त्यांनी एकच हंबरडा फोडला आणि परिसरात शोकाकुल वातावरण पसरले. स्थानिकांनी तातडीने तालुका जालना पोलीस ठाण्याला याबाबत कळवले. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी स्वतः तपासाची सूत्रे हाती घेतली. त्यांनी फॉरेन्सिक तज्ञांची टीम घटनास्थळी पाठवली असून सर्व पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. पोलिसांनी सांगितलं की, प्रथम दर्शनी परीवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला करून तिचा मृत्यू झाल्याचे दिसत आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच निश्चित सांगता येईल.



## माद‌ळमोही जि.प.गटामधुन अन्सार भाई शेख निवडणूक लढणार



मादळमोही । दिव्य न्युज

जिल्हा परिषद पंचायत समितीचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर प्रत्येक गटातून आणि गणातून कामाला लागले आहेत. मादळमोही इच्छूक कार्यकर्ते निवडणूकीच्या जिल्हा परिषद गटातून अन्सार भाई शेख हे निवडणूक लढविणार असून तशी त्यांची चर्चा या गटामध्ये होताना दिसून येत आहे. दिवाळीनंतर निवडणूकीची घोषणा होणार आहे. इच्छूक कार्यकर्ते आतापासूनच निवडणूकीच्या कामाला लागले आहेत. गटात आणि गणामध्ये फिरू लागले. मादळमोही जिल्हा परिषद गटामधून अन्सार भाई शेख यांच्या नावाची चर्चा होताना दिसून येत आहे.

## टाकरवन येथील इनामदार कुटुंबाचा अभिमान आदिल इनामदार यांना BAMS पदवी प्राप्त



टाकरवन । दिव्य न्युज

इनामदार परिवारासाठी अभिमानाचा क्षण उजाडला आहे. या कुटुंबातील लाडके सुपुत्र आदिल इनामदार यांनी BAMS (Bachelor of Ayurvedic Medicine and Surgery) ही पदवी यशस्वीरीत्या पूर्ण करून कुटुंबाचे तसेच गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

आदिल इनामदार हे आपल्या मेहनती, चिकाटी आणि समर्पणासाठी ओळखले जातात. वैद्यक शिक्षणाच्या कठीण प्रवासात त्यांनी सातत्याने अभ्यास आणि संयम ठेवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आयुर्वेद क्षेत्रातील सेवाभाव आणि मानवी आरोग्य उन्नतीसाठी काम करण्याचा त्यांचा निर्धार आहे.आदिल यांचे प्राथमिक शिक्षण बीडच्या नामंकीत शाळा सेंट अन्स इंग्लिश स्कूल मध्य झालेले आहे, या यशानंतर इनामदार कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून आदिल यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.आदिल हा मिलिया वरिष्ठ महाविद्यालया चे प्राध्यापक डॉ.रफीक शेख सर व डॉ. एजाज परवीन मॅडम यांचे जेष्ठ चिरंजीव आहे, आदिल इनामदार यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शुभेच्छा देताना शम्स अल्पसंख्याक बहूउद्देशीय सेवाभावी संस्था टाकरवन यांच्या वतीने शुभेच्छा देताना अध्यक्ष गाजीउद्दीन इनामदार सचिव मोहसीन इनामदार,नईम इनामदार सर, रियाज इनामदार, आदीब रुहान,अलताफ सय्यद, मुबिन इनामदार, जकी इनामदार,डॉ. मोहम्मद शकील, सोहेल शेख,समीर शेख.

## जिंतुर तालुक्यातील इटोली (डोगरतळा) येथे झालेल्या सामुहिक बलात्काराची एस.आय.टी मार्फत होणार चौकशी

### नऊ अधिकारी व सतरा पोलीस अमलदारचा समावेश

जिंतूर/दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूरतालुक्यातील इटोली शिवारात झालेल्या सामुहिक बलात्काराची एसआयटी मार्फत चौकशी होणार आहे.

या प्रकरणातील सहा आरोपींनी सदर ठिकाणी अनेक वेळा वेगवेळ्या वेळी असे प्रकार घडल्याचे अंदाज वर्तविले जात असल्याने पोलीस प्रशासन गाभीर्य ओळखून या सर्व प्रकाराची एसआयटी चौकशी करण्यासाठी ०९ पोलीस अधिकारी व १७ पोलीस अंमलदाराची टिम तयार केली असुन जिल्हापोलीस अधिक्षक श्री रविंद्रसिह परदेशी यांनी जिंतूर तालुक्यातील नागरींकाना आवाहन केले आहे की, जर अश्या घटना घडल्या असल्यास ज्याना ज्याना माहिती असेल त्यांनी पोलीसांना माहिती द्यावी माहिती देणाऱ्याचे नाव, पत्ता गुप्त ठेवल्या जाईल जे कोनी अश्या घटनाने पिडीत असेल त्यानी पोलिसांशी संपर्क साधून अथवा मोबाईल द्वारे माहिती द्यावी पुन्हा असे प्रकार भविष्यात घडणार नाही. संपर्क अधिकाऱ्याचे नाव व मोबाईल नंबर १) मा. पोलीस अधिक्षक श्री रविंद्रसिह परदेशी ९९२३१०३५३५ २) मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री जिवन बेनिवाल ८९४९४५१७९४ ३) मे. पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे ९८२३४१८१२१ वरील अधिऱ्याशी संपर्क करावा व तपासकामी सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी केले व पोलीस अधिक्षक श्री रविंद्रसिंह परदेशी आणि त्यांची संपूर्ण टिम ने सामूहिक बलात्काराची घटना स्थळी भेट देऊन पाहणी केली.





बीड : काल सोमवारी दि.२०/२०/२०२५ रोजी पेठ बीड विभागातील राजेशसिंग राजेंद्रसिंग शिकलकरी वय-७ वर्ष या बालकाने फटाक्यांची दारु कागदावरच पेटवली, यामुळे त्याच्या दोन्ही डोळ्यांना गंभीर इजा पोहचली आहे व चेहरा भाजला होता. आज मी व विनोदजी हतागळे यांनी रुग्ण व नातेवाईक यांची भेट घेतली.रुग्णावर इलाज करणारे नेत्ररोग तज्ञ डॉ.राधेश्याम जाजू यांच्या रुग्णालयात जाऊन विचारपूस केली यावेळी रुग्णाला संपूर्ण इलाजासाठी खर्च करण्याचे मदतीचे आश्वासन आम्ही म्हणजेच मी आणि विनोदजी हतागळे दोघांनी मिळून दिले. यावेळी गरज पडल्यास जालना येथील गणपती रुग्णालय व महाराष्ट्रातील चांगल्या रुग्णालयात उपचारासाठी मदत करण्यासाठी मदतीचे आश्वासन दिले आहे.

## स्थानीक स्वराज्याची लढत, महायुतीत स्वतंत्र

## दोन्ही राष्ट्रवादीच्या बैठका,अजित पवारांच्या राष्ट्रवादीची ताकद वाढली

### माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर अजितदादांच्या गटात प्रवेश करणार



बीड । दिव्य न्युज

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात पक्षीय पातळीवर तयारी सुरू झाल्याचे दिसून येत असून महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होईल, असे वाटत असतानाच महायुतीत मात्र स्वबळावर लढण्याचा नारा दिला जात आहे. त्यामुळे जिल्हा परिषद असो अथवा नगर परिषद असो या दोन्ही निवडणुकांमध्ये बंडखोरीसह तिरंगी-चौरंगी लढतीची आजच दाट शक्यता वर्तवली जात आहे. बीड जिल्ह्यात दोन राष्ट्रवादी विरुद्ध भाजप अशी लढत अनेक ठिकाणी होताना दिसून येईल. अजित पवारांच्या राष्ट्रवादीची ताकद सध्यातरी बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिसून येत असून राज्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे आपल्या कार्यकर्त्यांसमवेत अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये डेरेदाखल होत आहेत. पाडव्याचा मुहूर्त ठरल्याचे सांगितले जात असून मुंबईमध्ये जयदत्त क्षीरसागर हे प्रवेश करतील, असेही सुत्रांचे सांगणे आहे.

नगरपालिका जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या अनुषंगाने गेल्या दोन दिवसात अजित पवारांच्या राष्ट्रवादीसह शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली. प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीतील या बैठकीमध्ये निवडणूक लढवण्यापासून ते युतीपर्यंत चर्चा झाली. सुत्रांचे सांगणे आहे, महायुतीमधील भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये युती होण्याची धूसर शक्यता आहे. त्यामुळे हे दोघेही स्वबळावर लढण्याच्या तयारीमध्ये ठिकठिकाणी दिसून येत आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीची बीडमध्ये मोठी ताकद आहे. त्यात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे अजित पवार गटाकडे जाहीर प्रवेश करत आहेत. पाडव्या दिवशी मुंबईत त्यांचा प्रवेश होणार असल्याचे सूत्रांचे सांगणे आहे. दुसरीकडे शरद पवार गटाची राष्ट्रवादीही हाबूक ठोकून तयार आहे. तर भारतीय जनता पार्टी स्वबळावर निवडणूक लढवण्याची इच्छा बाळगून असल्याचे सांगितले जाते.

## २१ ऑक्टोबर शहीद स्मृतीदिन म्हणून साजरा



परभणी । दिव्य न्युज : सालेह चाऊस

परभणी येथे दिनांक २१ क्टोबर रोजी शहीद जवानाच्या स्मनार्थ आज दिनांक २१ क्टोबर रोजी परभणी येथे पोलीस मुख्यालयात साजरा करण्यात आला .

या वेळी परभणीच्या पालकमंत्री सौ मेघना दिदि बोर्डीकर( साकोरे) ह्या उपस्थित होत्या तसेच जिल्हाअधिकारी श्री संजय चव्हाण, परभणी पोलीस अधिक्षक श्री रविंद्र सिह परदेशी, जिल्हापरिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नतीशा माधूर मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री जिवन बेनिवाल सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. हा दिन दिनांक २१ क्टोबर१९५९ या दिवशी लडाख मधील भारतीय सीमेवर समुद्र सपाटीपासून सुमारे१६००० फुट उंच व हिमालयाच्या बर्फाळ प्रदेशात भारत- चिन सिमेवर गस्त घालणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलातील१० जवानांच्या तुकडीवर चीनी सैनिकांनी अचानक हल्ला केला होता. हॉटस्प्रिग येथे झालेल्या या हल्ल्यामध्ये देशाच्या सिमेवर रक्षण करतांना १० शुरविरांनी शेवटच्या क्षणापर्यंत शौर्याने लढा दिला व त्यांना विरगती प्राप्त झाली होती. या घटनेमुळे संपूर्ण भारतभर दुःखाची कळा पसरली होती, भारताच्या वीर जवावांनी दाखविलेल्या आतुनिय शौर्यापासून आम्हा सर्वांना स्फुर्ती मिळावी तसेच आपल्या कर्तव्याची व राष्ट्रनिष्ठेची जाणीव राहावी म्हणून २१ अक्टोबर हा शाहिद स्मृतीदिन म्हणून पाळला जातो.

# राजयोग फाऊंडेशन रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या वतीने हजारो कुटुंबीयांना दिवाळी फराळ व दिवाळी सणाचे साहित्य वाटप

## १५ संस्था व आश्रमांसहित अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबीयांचाही यात समावेश






बीड । दिव्य न्युज

फराळाशिवाय दिवाळी हे समीकरणच जुळत नाही.काहीसा गोड, काहीसा तिखट पण चविष्ट असणारा दिवाळीतील महत्त्वपूर्ण ठेवा म्हणजे फराळ. राजयोग फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन च्या वतिने दिवाळी सणानिमित्त गोरगरिबांच्या घरात आनंदोत्सव साजरा व्हावा, गरजु कुटूंबांची दिवाळी आनंदाने साजरी व्हावी यासाठी राजयोग फाउंडेशन व रोटरी मागील ९ वर्षांपासून निस्वार्थ भावनेतून हे समाजसेवेचे कार्य अविरत पार पाडत आहेत. यानिमित्ताने हजारो निराधार गरजवंत कुटुंबांसह शहरातील दिव्यांगांना दिवाळी फराळ व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच जिल्ह्यातील सुमारे १५ वेगवेगळया वृद्धाश्रम, बालकाश्रम व निराधार केंद्रातील आश्रय दात्यांना देखील लाभ देण्यात आला.तसेच या वर्षी मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबीयांना देखील फराळाचे वाटप केले. यामधे पसायदान प्रकल्प-ढेकणमोह, आपला परिवार-नेकनुर, लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे वृद्धाश्रम- घाटसावळी, शांतिवण- आर्वी, सेवाश्रम-ब्र.येळंब, आजोळ परिवार वृद्धाश्रम- राक्षसभुवन ता.शिरुर, कामधेनु वृद्धाश्रम- कोळवाडी, ईन्फंट आश्रम- पाली, आदीवासी समीकरण, सहारा बालग्राम - गेवराई, स्नेहसावली- रामनगर, निवारा बालगृह- सौताडा यांच्यासह बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र - बीड , रोटरी अन्नछत्र - दत्तमंदिर, विहान प्रकल्पातील दुर्धर आजारग्रस्त कुंटुंब आदिंचा समावेश होता. त्याचबरोबर बीड शहरातील मोंढा रोड



येथील अमरधाम व इतर स्मशानभूमींची देखभाल करणाऱ्या कुटुंब आणि तृतियपथी समुदायाला पण दिवाळी फराळ व इतर साहित्य देण्यात आले. या उपक्रमाप्रसंगी राजयोग फाऊंडेशन चे अध्यक्ष शुभम धुत, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे अध्यक्ष राहुल बोरा, सचिव डॉ.प्रकाश कोंका, डॉ.सुरेंद्र बजाज, राजेश बंब, संतोष टवाणी, सुर्यकांत महाजन, सुरेश बुद्धदेव, दिनेश लोळगे, भारत शेटे, अमोल तळेकर, संजय गुप्ता, जितेंद्र बोरा, विशाखा सूर्यवंशी, सर्वज्ञ जोशी, डॉ.सुधीर येवले, नितीन भोसले, शुभम कातांगळे, ऋषभ वाघमारे, गिरीश मुंदडा, डॉ.वैभव कोठेकर, सागर वाहुळ, राजदीप धुत, मेघराज जगदाळे, संकेत करवा, वैभव जाधव, मुकुंद त्रिमुखे, अभिजित आव्हाड, ओंकार बोबडे व इतर उपस्थित होते.




# शनिवार वाडा प्रकरण तापले!औरंगजेबाच्या कबरीपुढे जाऊनसंग्राम बापू यांचे खुले आव्हान!



पुणे । दिव्य न्युज

पुण्यातील शनिवार वाड्यात नमाज पठण करत असल्याचा एक कथित व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओचा आधार घेऊन शनिवार वाड्यात नमाज पटण केले जात असल्याचे बोलले जात आहे. भाजपाच्या नेत्या मेधा कुलकर्णी यांनी व्हिडीओनंतर शनिवार वाड्याच्या भागात आंदोलन केले. तर दुसरीकडे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे यांनी मेधा कुलकर्णी यांना अटक करावी ही मागणी घेऊन (२० ऑक्टोबर) आंदोलन केले. दरम्यान, आता शनिवार वाड्यातील कथित नमाज पठणाच्या वादात संग्राम बापू भंडारे यांनी उडी घेतली आहे. त्यांनी औरंगजेबाच्या कबरीजवळ दिवा लावून दाखवा आणि एक लाख रुपये बक्षीस घ्या, असे आव्हान दिले आहे.

## पुणे महानगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून

छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य टिकवून ठेवण्यात शनिवार वाड्याचा सिंहाचा वाटा आहे. याच शनिवार वाड्यात काही महिला नमाज पठण करत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. या घटनेवर भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी आक्षेप घेतला आहे आणि संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पण दुर्दैव असं आहे की, पुण्यातील काही 'हिंदू' मंडळी आगामी पुणे महानगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राजकीय स्वार्थापोटी खासदार मेधा कुलकर्णी यांच्या भूमिकेला विरोध करत करायला सुरुवात केली आहे, असा आरोप वक्ते संग्राम बापू भांडारे यांनी केला आहे.













हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०